लोकमत

# कोरोना मुकाबल्यासाठी 'रवळनाथ'कडून १५ हजार

लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : कोरोना साथीचा संसर्ग आणि फैलाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतर्गत पीपीई किट्स् खरेदीसाठी रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्सतर्फे १५ हजारांची आर्थिक मदत दिली. आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांच्याकडे 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

कोरोनाच्या मुकाबल्यासाठी यापूर्वी रवळनाथतर्फे गडहिंग्लज उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज नगरपरिषद, गडहिंग्लज पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक कार्यालय, आजरा तहसील कार्यालय, आजरा पोलीस ठाणे, कुडाळ पोलीस ठाणे, ज्येष्ठ नागरिक, सभासद, कर्मचारी व पत्रकार, आदींना मिळून सुमारे ८०० मास्कचे वाटप केले. गडहिंग्लज तालुक्यातील ९३ गावांतील प्रत्येकी पाच कुटुंबांनी १०० ग्रॅम चहा पावडरचे ३२२ पाऊच गडहिंग्लज तहसीलदारांकडे सुपूर्द केले.

स्थापनेपासून सामाजिक बांधीलकीतून विविध उपक्रम राबविणाऱ्या 'रवळनाथ'तर्फे पंतप्रधान निधीला पाच लाखांची मदत करण्यात येणार आहे.

Hello Kolhapur
Page No. 6 May 14, 2020
Powered by: erelego.com